# नियमीत दिवाणी दावा क्र.२२१/२०२४
**CNRNOMHOS120003182024**
**मुक्ताबाई वि. गोरख व इतर**
**नि.क्र. २६ खालील आदेश**
**(आदेश दि.१८/१०/२०२५)**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्यबातल होवुन त्यांची कैफियत दाखल करुन घेणेसाठी केलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, दावा वाढीव पोटगी मिळणेकरिता आहे. प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द दिनांक १८.०६.२०२५ रोजी लेखी कैफियत नाहीचा आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ हे जामखेड येथील दवाखान्यामध्ये ॲडमीट असल्याकारणाने व प्रकरणाच्या संदर्भाने आवश्ययक ती माहिती व कागदपत्रे त्यांच्या विधीज्ञांना वेळेवर देऊ न शकल्याने वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले आहे की, अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ हा हेतुपुरस्पर प्रकरणात विलंब व्हावा व वादीस त्रास देण्याच्या उद्येशाने उशीरा कैफियत दाखल करत आहे. सबब, सदरहू अर्ज नामंजुर होणेकरीता विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तीवाद नाही.

५. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, दिनांक १८.०६.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ विरुध्द कोणताही विना कैफियत आदेश पारीत झाला नाही. प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. १ विरुध्द जरी विना कैफियत आदेश पारीत झालेला नसला तरी तो दिनांक १३.०१.२०२५ रोजी प्रस्तुत प्रकरणात

हजर झाल्याचे दिसून येते. तदनंतर ते प्रस्तुत अर्ज दाखल करेपर्यंत त्याने कैफियत दाखल केलेली नाही. त्याने प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०८.०८.२०२५ रोजी सादर केलेला आहे. त्याने त्या अर्जात त्याची कैफियत स्विकारावी अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ दाखल करत असलेली कैफियत ही विहित कालावधीत दाखल केलेली नसल्याचे दिसून येते. कैफियत दाखल करण्यास उशीर का झाला याबाबत अर्जात नमूद केलेले कारण रास्त व संयुक्तीक वाटते. तरी दाव्याचा गुणदोषावर निकाल करण्याच्या हेतूने प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने रक्कम रुपये ३००/- इतकी कॉस्ट वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो व प्रतिवादीला कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत प्रतिवादीने सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2025.10.11 15:17:43 +0530

दिनांक – १८.१०.२०२५

( राहुल द. डांगे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 18/10/2025 |

| | | |
|---|---|---|
| Order signed by the Presiding Officer on | --- | 18/10/2025 |
| Order uploaded on | --- | 18/10/2025 |